लोकमत



# अधिकाऱ्यांचे काम लोकजीवन सोपे करण्याचे

## एस. चोक्कलिंगम : अधिकाऱ्यांना प्रशिक्षण

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे:** सरकारी कामकाज करताना नियम, कायदे यांचे पालन करणे महत्त्वाचे आहेच, त्यासाठी त्यांची माहिती करून घेणे जास्त गरजेचे आहे. त्याचबरोबर, सरकारी अधिकाऱ्यांचे खरे काम लोकजीवन सोपे करणे हेच आहे, असे प्रतिपादन यशदा अकादमीचे महासंचालक एस.चोक्कलिंगम यांनी केले.

कामगार राज्य विमा महामंडळ, राष्ट्रीय प्रशिक्षण अकादमीच्या वतीने यशदा अकादमीत महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी यांना दोन दिवसांचे प्रशिक्षण देण्यात आले. चोक्कमलिंगम यांच्या प्रमुख उपस्थितीत या बुधवारी (दि. २६) या प्रशिक्षण वर्गाची सुरूवात झाली. कामगार राज्य विमा महामंडळ, मुख्यालय, नवी दिल्लीतील सहसंचालक एम. जॉर्ज व उप प्रादेशिक कार्यालय, पुणेचे कार्यालयप्रमुख तथा उपसंचालक प्रभारी हेमंत कुमार पांडेय कार्यक्रमाला उपस्थित होते.

चोक्कलिंगम म्हणाले, अधिकाऱ्यांना नियम व कायदे यांची सविस्तर माहिती असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर, कामाचा मुख्य उद्देश हा लोकांची कामे व्हावीत, त्यांना सरकारी नियमपालन सोपे व्हावे, हाच असतो. त्या दृष्टीने असे प्रशिक्षण उपयोगी व महत्त्वाचे आहे.

एम.जॉर्ज, हेमंत कुमार पांडेय, तसेच राजीव लाल, राकेश चौहान, सुनील महतो यांनी यावेळी अधिकारी, कर्मचाऱ्यांनी विविध विषयांची माहिती दिली. त्यांनी विचारलेल्या सर्व शंका, तसेच प्रश्नांचे निराकरण या अधिकाऱ्यांनी केले.






# पुणे

## पुणे येथे कामगार राज्य विमा महामंडळ व राष्ट्रीय प्रशिक्षण अकादमीच्या वतीने यशदा अकादमी येथे २ दिवसांचा प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला

punenews24.in

पुढारी



दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिरात मार्गदर्शन करताना मान्यवर.

# ज्ञानामुळे सर्वसामान्यांच्या जीवनात बदल

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

प्रशिक्षणार्थीनी नियम आणि नियमांबद्दल ज्ञान प्राप्त करून व्यवस्था, विभाग आणि लोकांच्या सेवेसाठी अपरिहार्य बनने गरजेचे आहे. नियमांचे पालन करताना लोकांचे जीवन सोपे करणे आवश्यक आहे. आपण ज्ञान प्राप्त करून त्याचा उपयोग लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवू शकतो, असे प्रतिपादन यशदाचे महासंचालक एस. चोक्कलिंगम यांनी केले.

> महासंचालक एस. चोक्कलिंगम यांचे प्रतिपादन

कामगार राज्य विमा महामंडळ, राष्ट्रीय प्रशिक्षण अकादमीच्या वतीने यशदा अकादमी येथे आयोजित दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिरात ते बोलत होते. या वेळी कामगार राज्य विमा महामंडळ, मुख्यालय, नवी दिल्ली येथील सहसंचालक एम. जॉर्ज व उपप्रादेशिक कार्यालयप्रमुख तथा उपसंचालक प्रभारी हेमंत कुमार पांडेय उपस्थित होते. या प्रशिक्षण कार्यक्रमात पश्चिम विभागातील - महाराष्ट्र, गुजरात, गोवा आणि राजस्थानमधून ५६ अधिकारी आणि कर्मचारी सहभागी झाले होते. उपप्रादेशिक कार्यालय, सुरतचे प्रमुख दीपक मलिक, उपप्रादेशिक कार्यालय, उदयपूरचे राजीव लाल, उपसंचालक राकेश चौहान, कर्नाटकातील उपसंचालक (वित्त) सुनील महतो यांचे महामंडळातील वित्त विभागाशी संबंधित विविध विषयांवर व्याख्यान झाले. सर्व प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.